वि.दि.दा.क्रं.०३/२०२०
नरसिंग वि. वनिता

## नि.क्रं. ६९ खाली आदेश

सदर अर्ज वादीने देऊन नमूद केले की, नि.क्रं. ६३ वरील आदेशाप्रमाणे न्यायालयाने अर्ज मंजूर केला. त्यानुसार नि.क्रं. ४/१ चा दस्त विधीज्ञ श्री.वाय.डी.कराड यांना शाबीत करायचा आहे त्यामुळे त्यांना समन्स व्हावे.

२. प्रतिवादीने दिलेल्या म्हणण्यानुसार अर्ज खोटा असून विधीज्ञ श्री. कराड हे त्या दस्ताचा भाग नाही व त्यांची साक्ष नि.क्रं.५५ वर यापूर्वीच झालेली आहे. त्यामुळे अर्ज रद्द करावा अशी विनंती करण्यात आली.

३. उभय पक्षाकांरातर्फे युक्तीवाद ऐकला.

४. यापूर्वी नि.क्रं.६५ वर असाच अर्ज दिला होता. त्यामध्ये नरसिंग याची अधिकारपत्रधारक अर्चना हिच्या जन्माच्या अगोदरचा नि.क्रं.४/१ चा दस्त असल्याने तिला त्याबद्दल विचारणा करणे अयोग्य होईल आणि दस्त मुळ स्वरुपात नसल्याने भारतीय पुरावा अधिनियम १८७२ कलम ९० चे गृहीतक त्याला लागू होणार नाही असे नमूद करुन, वादी नरसिंग याचे वय लक्षात घेऊन त्याची कमिशनवर साक्ष घेण्यावर नि.क्रं.६५ वर आदेशीत झाले होते.

५. वादी नरसिंग याच्याबद्दल डॉ.अतुल खडके या मधुमेह तज्ञांनी दिलेला दाखला नि.क्रं.६८/१ लगत दाखल आहे. त्यात त्यांचे वय ८२ वर्षे असून ते आजारी असून त्यांचा चालता फिरता येत नाही, डोळयाने कमी दिसते, बोलता येत नाही तसेच त्यांना दम लागतो, गर्दीच्या ठिकाणी ते जाऊ शकत नाहीत, असा अभिप्राय दिला आहे.

६. सदर दस्त त्याची सत्यासत्यता, योग्यायोग्यता, पुराव्यातील त्याचे महत्व, स्वीकारर्हता याबाबी युक्तीवादाचा भाग राहतील. त्यामुळे सदर दस्तावर तो निष्पादीत झाला आहे की नाही एवढयाच मुद्दयावर ॲड.श्री.वाय.डी.कराड यांची फेरसाक्ष घेण्यासाठी त्यांना समन्स काढण्यात यावे. येताना त्यांनी दस्ताच्या अनुषंगाने त्यांच्याकडील दस्ताऐवज सोबत

आणावेत.  यापूर्वीच नि.क्रं.५५ वर त्यांची साक्ष झाली असल्याने त्यापुढेच सदर साक्ष फेरतपास व त्यावरील उलटतपास म्हणून नोंदवावी.

स्वाक्षरीत/-

( एस.एन.सरडे )

दि.१९/०१/२०२६ दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अहमदपूर.